**<u>नियमित दिवाणी दावा क्र. ५७/२०२०</u>**

**<u>CNR No. MHSO060005692020</u>**

शामल रणदिवे

वि.

राजाराम भोसले वगैरे

## <u>आदेश निशाणी क्र. ४५ आणि निशाणी क्र. १ वर</u>

०१. प्रतिवादी क्र. १ राजाराम ज्ञानोबा भोसले यांचे कैफियतशिवाय दावा पुढे चालवण्यात यावा असा आदेश करण्यात आलेला आहे. प्रतिवादी क्र. १ हे शेतकरी आहेत. आवश्यक माहिती व कागदपत्रे त्यांना उपलब्ध झाली नाहीत. त्यामुळे ते मुदतीत कैफियत देवू शकले नाहीत. तरी त्यांचे कैफियतशिवाय दावा पुढे चालवण्याचा झालेला आदेश रद्द करण्यात यावा यासाठी हा अर्ज देण्यात आलेला आहे.

०२. त्यावर वादी यांनी तीव्र आक्षेप नोंदवला आहे. अर्जातील मजकूर खरा नाही. पुरेशी मुदत व संधी देवूनही प्रतिवादी यांनी कैफियत दिलेली नाही. त्यामुळे अर्ज नामंजूर करण्यात यावा असे वादी यांनी नमूद केले आहे.

०३. प्रकरणात अद्याप निशाणी क्र. ५ प्रमाणेच्या अर्जावर अंतिम सुनावणी झालेली नाही. प्रतिवादी क्र. १ यांनी या अर्जासोबत त्यांची कैफियत दिलेली आहे. त्यामुळे या दाव्याचा गुणदोषावर अंतिम व योग्य न्यायनिर्णय होण्यासाठी प्रतिवादी क्र. १ यांचे कैफियतशिवाय दावा पुढे चालवण्याच्या झालेला आदेश रद्द करुन त्यांनी दिलेली कैफियत रेकॉर्डवर घेणे न्यायाच्या दृष्टीने योग्य राहील. सबब, मी पुढीलप्रमाणे आदेश देत आहे.

## <u>आ दे श</u>

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी क्र. १ यांचे कैफियतशिवाय दावा पुढे चालवण्याचा झालेला आदेश रद्द करण्यात येत आहे. त्यांनी दिलेली कैफियत रेकॉर्डवर घेण्यात येत आहे.

स्वाक्षरी/–

दि. ०६/०३/२०२१

( श्रीकृष्ण हरीभाऊ इनामदार )
सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, पंढरपूर

**CERTIFICATE**

I, affirm that the contents of this PDF file Order are same word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of stenographer | : | A. S. Bavikar |
| Name of the Court | : | Jt. C.J.S.D., Pandharpur |
| Order signed by the P. O. on | : | 06/03/2021 |
| Order uploaded on | : | 06/03/2021 |